


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# युवा टीम इंडिया विश्व चॅम्पियन!

## ठोकला जेतेपदाचा 'विक्रमी षटकार'

मुंबई : (समर्थ गांवकरी)

१९ वर्षांखालील विश्वचषक २०२६ च्या थरारक अंतिम सामन्यात भारतीय युवा संघाने इंग्लंडचा १०० धावांनी धूळ चारून विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. या विजयासह भारताने सहाव्यांदा १९ वर्षांखालील विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरून जागतिक क्रिकेटमध्ये आपला दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. सलामीवीर वैभव सूर्यवंशीची १७५ धावांची विश्वविक्रमी खेळी आणि त्यानंतर गोलंदाजांनी दाखवलेला संयम याच्या जोरावर भारताने क्रिकेट जगतात पुन्हा एकदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय सलामीवीर वैभव सूर्यवंशीने इंग्लंडच्या गोलंदाजांचा अक्षरशः चोथा केला. त्याने केवळ ८० चेंडूंमध्ये १७५ धावांची अविश्वसनीय खेळी साकारली, ज्यात १५ चौकार आणि १५ उत्तुंग षटकारांचा समावेश होता. विश्वचषक फायनलमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा आणि एका डावात सर्वाधिक १५ षटकार



मारण्याचा ऐतिहासिक विक्रम वैभवने आपल्या नावे केला. त्याच्या या तुफानी खेळीमुळे भारताने ४११ धावांचा डोंगर उभा केला. विश्वचषकाच्या अंतिम सामन्याच्या इतिहासातील ही सर्वोच्च धावसंख्या ठरली, ज्याने इंग्लंडच्या गोलंदाजांचे नीतिधैर्य पूर्णपणे खच्ची केले.

४१२ धावांच्या विशाल लक्षाचा पाठलाग करताना भारताच्या आर. एस. अंबरीश आणि हेनिल पटेल यांनी सुरुवातीलाच सलग दोन 'मेडन' षटके टाकून इंग्लंडला बॅकफूटवर ढकलले. अंबरीशने जोसेफ मूर्सला १७ धावांवर त्रिफळाचीत करून इंग्लंडच्या पडझडीला सुरुवात केली. त्यानंतर मधल्या षटकांत खिलन पटेलने आक्रमक बेन मेयेसला (४५) बाद करून इंग्लंडच्या आशा संपुष्टात आणल्या. इंग्लंडचा संघ ८ बाद २७१ अशा दयनीय अवस्थेत असताना कॅलेब फाल्कनरने मैदानाचा ताबा घेतला. त्याने केवळ ६५ चेंडूंत १११ धावांची झंझावाती खेळी करत भारताचा विजय काही काळ लांबणीवर टाकला. ४० व्या षटकात अंबरीशच्या गोलंदाजीवर त्याने तीन षटकार ठोकत आपले शतक पूर्ण केले. त्याने एका बाजूने खिंड लढवत भारतीय गोटात काहीसे चिंतेचे वातावरण निर्माण केले होते, परंतु तो इंग्लंडला विजयापर्यंत पोहोचवू शकला नाही.

### विजयाचे शिल्पकार

- वैभव सूर्यवंशी : १७५ (८० चेंडू) - सामन्याचा नायक.
- अभिज्ञान कुंडू: ४० (३१ चेंडू) - मोक्याच्या क्षणी वेगवान धावा.
- आर. एस. अंबरीश: ९ षटक, ५६ धावा, ३ बळी - सुरुवातीला आणि अखेरीस महत्त्वपूर्ण यश.
- खिलन पटेल: फिरकीच्या जोरावर मुख्य फलंदाजांना बाद केले.

## थोडक्यात...

### मनसे आक्रमक

मुंबई (समर्थ गांवकरी) : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर तीन आणि चार फेब्रुवारी रोजी टँकर उलटून झालेल्या भीषण वाहतूक कोंडीबाबत MSRDC तसेच IRB Infrastructure या टोल वसुली करणाऱ्या कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेने जाब विचारला आहे. येत्या चार दिवसांत संबंधित अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही, तर मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोल नाके बंद पाडल्याशिवाय महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना स्वस्थ बसणार नाही, असा इशारा अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. ज्वलनशील वायू वाहून नेणारा टँकर घाटामध्ये उलटल्याने मुंबई व पुणे दोन्ही दिशांना प्रचंड मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. या कोंडीत अडकलेल्या प्रवाशांना अन्न, पाणी किंवा प्रसाधनगृह अशा कोणत्याही मूलभूत सुविधा पुरवण्यात आल्या नाहीत. उलट, अत्यंत निर्लज्जपणे या प्रवाशांकडून टोल वसुली करण्यात आली असा आक्षेप मनसेने घेतला आहे.

### धाराशिवमध्ये भाजप कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला

धाराशिव (समर्थ गांवकरी) : धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील शेळगाव येथे भाजप कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. गाडी अडवून जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. पाठलाग करणारी गाडी पोलिसांनी जप्त केली आहे. ऐन निवडणूक काळात गाडीत काठ्या आणि कुराडी असल्याने एकच खळबळ उडाली आहे. राजकीय वादातून काँग्रेस कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचा नातेवाईकांचा आरोप आहे.

## शिया मशिदीत नमाज दरम्यान आत्मघाती हल्ल्यात मृत्यूचं तांडव



मुंबई : (समर्थ गांवकरी)

- 69 ठार, 169 गंभीर जखमी; राजधानी इस्लामाबादमध्ये आणीबाणी जाहीर

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमधील एका शिया मशिदीत (इमांबरा) (6 फेब्रुवारी) नमाज पढत असताना आत्मघातकी हल्ला झाला. पाकिस्तानी वृत्तपत्र डॉनच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात 69 जणांचा मृत्यू झाला आणि 169 जण जखमी झाले. पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचले आहेत. त्यांनी बचाव कार्य सुरू केले आहे. रुग्णालयांना सतर्क करण्यात आले आहे आणि जखमींना हलवण्यात येत आहे. स्फोटानंतर, इस्लामाबाद पोलिस प्रमुखांनी शहरात आणीबाणी जाहीर केली. मृतांची संख्या वाढू शकते अशी अधिकाऱ्यांना भीती आहे. पाकिस्तानी सरकारचे मंत्री डॉ. तारिक फजल चौधरी यांनी सोशल मीडियावर लिहिले की, "मी इस्लामाबादमधील स्फोटाचा तीव्र निषेध करतो. जीवितहानीमुळे मला दुःख झाले आहे." अशा दहशतवादी घटनांमुळे देश आणि तेथील लोकांचे मनोबल खचू शकत नाही. आपण सर्वांनी शांतता, सहिष्णुता आणि स्थिरतेसाठी एकत्र आले पाहिजे आणि कायदा अंमलबजावणी संस्थांसोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. एचटीएन वर्ल्ड या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, मशिदीच्या गेटवर एका व्यक्तीने स्वतःला उडवून दिले.

## कुटुंबावर दु:खाचा डोंगर, आजोबांचं नातवांना मार्गदर्शन

### शरद पवारांची रोहित पवार आणि पार्थ पवार यांच्यासोबत चर्चा

पुणे (बारामती): (समर्थ गांवकरी)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार आणि पार्थ पवार यांचा बारामतीमधील एक फोटो समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान दुर्घटनेत 28 जानेवारीला निधन झालं. यामुळं पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनला उपस्थित न राहता बारामतीत थांबण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवार, रोहित पवार आणि पार्थ पवार यांचा आजचा एक फोटो समोर आला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सांत्पनवर भेटीसाठी बारामतीतील नागरिक भेट देत होते. आज या सांत्वनपर भेटीचा शेवटचा दिवस होता. बारामतीमधील सहयोग बंगला येथे आज शरद पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य देखील



सांत्वनपर भेटीसाठी उपस्थित होते.

या दरम्यानचा एक फोटो समोर आला आहे. हा फोटो शरद पवार, पार्थ पवार आणि रोहित पवार यांचा आहे. यावेळी शरद पवार पार्थ पवार आणि रोहित पवार यांना मार्गदर्शन करत असल्याचं पाहायला मिळतं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं स्मारक बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर उभारण्यात येणार आहे. या संदर्भात देखील चर्चा सुरु आहेत. शरद पवार यांची पार्थ पवार, जय पवार यांनी भेट घेतली होती. बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठान येथे अजित पवार यांचं स्मारक कशा प्रकारचं असावं या संदर्भातील चर्चा सुरु आहेत. आज बारामती इथल्या सहयोग सोसायटीमध्ये अजित दादा पवार यांच्या निधनानंतर आज श्रद्धांजली ला पवार कुटुंब एकत्रित पाहायला मिळाले.पार्थ पवार आणि रोहित पवार, शरद पवार यांच्याशी चर्चा करतानाचा फोटो समोर आला आहे. शरद पवार यांनी कालच माध्यमांसोबत सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपद मिळालं हे स्वागतार्ह असल्याचं म्हटलं. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी मुंबईहून बारामतीला येत असताना त्यांचं विमान बारामतीच्या विमानतळाजवळ दुर्घटनाग्रस्त झालं होतं. त्यात अजित पवार यांच्यासह इतर चार जणांचा मृत्यू झाला होता.

## सुनील तटकरेंनी गलिच्छ राजकारण केलं : रामदास कदम

मुंबई : (समर्थ गांवकरी)

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या निधनानंतर सुनील तटकरे यांनी गलिच्छ राजकारण केलं असल्याची टीका शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री रामदास कदम यांनी केली होती. शरद पवार यांना शह देण्यासाठी सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार वहिनींना शपथ घ्यायला लावली असं रामदास कदम म्हणाले होते. कदम यांच्या या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई कार्याध्यक्ष मनिषा तुपे यांनी उत्तर दिलं आहे. रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कामकाजात नाक खुपसायचे काही कारण नाही, असं मनिषा तुपे यांनी म्हटलंय.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई कार्याध्यक्ष मनिषा तुपे यांनी रामदास कदम यांना प्रत्युत्तर दिलं आहे. रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कामकाजात नाक खुपसायचे काही कारण नाही. आमचे सर्व नेते, आमदार, कोअर कमिटीने सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय एकत्रितपणे घेतला आहे, असं मनिषा तुपे म्हणाल्या. अहो बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांना तुम्ही किती त्रास दिलात हे जगजाहीर आहे. खाल्या मिठाला जागणारे तुम्ही नाही तर खाल्या ताटात विष कालावणारे तुम्ही आहात, असं मनिषा तुपेंनी म्हटलं. दादांबद्दल सांगायचं तर दादांचे पुतणे युगेंद्र पवार यांच्या विवाहसोहळ्याला नगरपालिका निवणूकांमुळे दादा उपस्थित न राहता नंतर कुटुंबाला भेटणारे दादा होते. म्हणूनच अवघ्या महाराष्ट्रात कामाचा माणूस म्हणून दादांची ओळख होती, असं मनिषा तुपे यांनी म्हटलं. याच दादांच्या आदर्शावर पाऊल ठेवत दुःखाची राख सावडून सुनेत्रा वहिनी खंबीर पणे उभ्या राहत असतील तर संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस परिवार वहिनींसोबत धीराने उभा आहे.

# अखेर काँग्रेसचे २७ नगरसेवक एकत्र

### नागपूर कार्यालयात गटनोंदणी; गटनेतेपदी राजेश अडुर, महापौर कोण?

चंद्रपूर: (समर्थ गांवकरी)

काँग्रेसचे सर्वाधिक नगरसेवक विजयी झाल्यानंतरही गेल्या काही दिवसांपासून चंद्रपूर काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी समोर आली होती. अखेर, दिल्ली दरबारी सर्व नगरसेवकांना नेऊन हा वाद संपुष्टात आल्यानंतर आज नागपूरमध्ये जाऊन काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांची गटनोंदणी करण्यात आली. तर, गटनेतेपदावर राजेश अडुर यांची निवड करण्यात आली असून महापौर हा वरिष्ठांच्या आदेशानुसार ठरवला जाईल, असे त्यांनी म्हटले. तसेच, काँग्रेसची प्रक्रिया (रणनीती) म्हणून दोन ते तीन फॉर्म आमच्या काँग्रेसचे नगरसेवकांनी भरले आहेत, ते वेळेवर



मागे घेतले जाईल. मात्र, महापौर कोण होईल हे आमचे नेते ठरवतील. सर्व उमेदवार काँग्रेसचे आहेत, आता कोणीही कोणत्या गटाचा नाही. सर्व 27 नगरसेवक एकसोबत आहेत. आता कुठलाही वाद नाही, कधी कोणताही वाद नव्हता, सर्व आनंदी वातावरण आहे, असे अडुरे यांनी म्हटले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशाप्रमाणे गट नेता म्हणून माझी निवड करण्यात आली आहे. तर, विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनात हा गट तयार झाला आहे. या गटात काँग्रेसचे सर्व 27 नगरसेवक सहभागी आहेत. आता, महापौरपदाची उमेदवार पक्षश्रेष्ठी ठरवणार आहेत. मात्र, महाविकास आघाडी आमच्या सोबत असून ठाकरे गट आमच्यासोबतच राहील असा विश्वास राजेश अडुर यांनी व्यक्त केला. जनविकास सेनाही आमच्यासोबत आहे, आम्ही सर्व मिळून महाविकास आघाडीचा महापौर करू, असेही अडुर यांनी सांगितले.

चंद्रपूर महानगरपालिकेतील काँग्रेस नगरसेवक एकत्रितरित्या त्यांच्या गट नोंदणीसाठी नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचले, तिथं 27 नगरसेवकांच्या गटाची नोंदणी करण्यात आली. काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या हस्तक्षेपानंतर राजेश अडुर यांची काँग्रेसचे गटनेते म्हणून निवड झाली आहे. येथे काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर या दोन नेत्यांच्या गटात नगरसेवकांची विभागणी झाली होती. त्यामुळे, चंद्रपूर महापालिकेत सातत्याने ट्विस्ट पाहायला मिळाला. अखेर दोन्ही गट एकत्र आल्याने आता महापौर कोण होणार, ठाकरेंची शिवसेना काँग्रेसला पाठिंबा देणार का हे पाहावे लागेल.



# सर्वांगीण विकासाचे आर्किटेक्ट : मा. आ. बाळासाहेब थोरात





महाराष्ट्र ही संत व विचारवंतांची भूमी आहे. देशाच्या राजकारणाला महाराष्ट्राने कायम दिशा दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज , फुले - शाहू - आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या या भूमित स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी कृषी-औद्योगिक क्रांतीचा पाया घालून विकसित महाराष्ट्र निर्माण केला. याच विचारांचा वारसा घेऊन राज्यात कार्यरत असलेले कॉंग्रेसचे मा. प्रदेशाध्यक्ष व मा.महसूलमंत्री मा. आ. बाळासाहेब थोरात हे सर्वसामान्य जनतेचे खऱ्या अर्थाने आश्वासक व महाराष्ट्राचे राजहंस नेतृत्व ठरले असून सर्वांगीण विकासाचे आर्किटेक्ट आहे.

स्वातंत्र्यसैनिक सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन 1985 साली ना. बाळासाहेब थोरात यांनी सर्वात कमी वयाचे लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या कार्यकर्तृत्वाला सुरुवात केली. पाण्यासाठी आग्रह धरताना भंडारदऱ्याच्या पाण्यावर संगमनेर ,अकोले तालुक्याला 1989 मध्ये 30 टक्के हक्क मिळवून दिला. याच काळात गावोगावी दूध संस्थांची निर्मिती करून संगमनेर तालुका हा दुग्ध व्यवसायात अग्रेसर बनवला. तसेच गावोगावी पाणीपुरवठा योजनांचे जाळे ही निर्माण केले. दुष्काळी भागाकरिता निळवंडे धरणाचा ध्यास घेतलेल्या ना.थोरात यांना 1999 मध्ये राज्य मंत्रिमंडळातील पहिली संधी मिळाल्यानंतर त्यांना अपेक्षित असलेले कॅबिनेट मंत्रीपद न मागता निळवंडे धरणाकरिता पाटबंधारे खात्याचे रायमंत्री पद घेतल.

अगदी पहिल्याच दिवशी निळवंडे च्या कामाची फाईल हाती घेऊन अनेक दिवस रेंगाळलेले निळवंडे खऱ्या अर्थाने 1999 मध्ये कार्यान्वित केले. अनेक अडचणीवर मात करुन आधी पुनर्वसन , मग धरण हा आदर्शवत प्रकल्प राबविला. अनेक अडचणींवर मात करुन निळवंडे धरणाचे काम 2012 पर्यंत पूर्ण केले. याच काळात प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवताना कवठे कमळेश्वर , पिंपळगाव कोंझिरा, गणेश वाडी येथील मोठ मोठे बोगदे ही मार्गी लावताना कालव्यांची कामे सुरू ठेवली. यासोबत संगमनेर शहरासाठी थेट पाईपलाईनची ऐतिहासिक योजना पुर्ण केली. संगमनेर शहरात हायटेक बस स्थानक, तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय, नगरपालिका, कवी अनंत फंदी नाट्यगृह, कोर्ट, पंचायत समिती यांसह अनेक वैभशाली इमारती उभारल्या.

समृद्ध सहकाराबरोबर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी गावोगावी रस्ते, इमारती, जलसिंचन योजना, सिमेंट बंधारे , दवाखाने , शाळा, विविध सभामंडप असे अनेक विकास कामे सातत्याने राबवली. सकाळी सात ते रात्री अकरापर्यंत अविश्रांत काम करताना नामदार बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यातून सलग आठ वेळेस विक्रमी मताधिक्याने विजयी होण्याचा मान मिळवला. आणि आज महाराष्ट्र विधानसभेत सर्वात जेष्ठ प्रतिनिधी म्हणून ते नेतृत्व करत आहेत. संपूर्ण राजकीय कारकिर्दीमध्ये प्रत्येक कामाला गती देत त्यांनी पारदर्शकपणे काम केले. शेतकरी , गोरगरीब , कष्टकरी , कामगार यांच्यासाठी सातत्याने विविध योजना प्रभावीपणे राबविल्या. मंत्रिमंडळात महसूल , कृषी , शालेय शिक्षण, रोजगार हमी ,पाटबंधारे अशी महत्वाची खाते भूषवताना या खात्यांना लोकाभिमुख व पारदर्शक बनवले. त्यांच्या कामाचा आवाका मोठा असल्याने पक्षाला मोठा जनाधार मिळवून दिला. कॉंग्रेस पक्षाची प्रामाणिकता व एकनिष्ठता यासंह सर्व कामांची दखल घेत केंद्रीय नेतृत्वाने कायम त्यांच्यावर जबाबदारी दिल्या.

ही जबाबदारी त्यांनी सक्षमपणे पार पाडली. याचबरोबर गुजरातचे हिमाचल प्रदेश निरीक्षक म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून श्रीमती सोनिया गांधी यांनी मार्च 2018 मध्ये कॉंग्रेसच्या अतिमहत्वाच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटी वर कायमस्वरूपी सदस्य म्हणून निवड केले आणि त्यांचे नेतृत्व अधोरेखित झाले. पुढे पक्षाला उभारी देण्याबरोबर विविध निवडणुकांमध्ये त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण राहिला 2019 मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर कॉंग्रेसची पीछेहाट झाली. अशातच अनेक जण पक्षांतर करू लागले. आणि या अडचणीच्या काळात कॉंग्रेसच्या अध्यक्षांनी नामदार बाळासाहेब थोरात यांच्या वर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. स्वातंत्र्यसैनिकांचे चिरंजीव असलेले नामदार बाळासाहेब थोरात यांनी ही जबाबदारी स्वीकारली.





अडचणीत असताना पळायचे नसते तर लढायचे असते हे सांगून सर्व कॉंग्रेसजनांना प्रोत्साहित केले.

पक्षाला पराभवाच्या मानसिकतेतून बाहेर काढले आणि विधानसभेमध्ये कॉंग्रेसचे दमदार आगमन झाले. कॉंग्रेस - राष्ट्रवादी व शिवसेनेचे महाविकास आघाडी होवून राज्यात नवीन सरकार स्थापन झाले. मंत्रिमंडळात महत्त्वाचे महसूलमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना पक्षप्रमुख आणि महत्त्वाचे मंत्री अशी दोन्ही जबाबदारी त्यांनी सक्षम पणे पार पाडली .

2020 मध्ये कोरोना संकटाने जगासह भारत देश ठप्प झाला. लॉकडाऊन मुळे अनेकांचे स्थलांतर होवू लागले.अशा अडचणीच्या काळात कोरोनाचा सामना करतांना दररोज 18 तास काम करुन नामदार थोरात यांनी शर्थीने महसूल विभाग व प्रशासनाचे नेतृत्व केले. कोरोना पाठोपाठ चक्रीवादळ,अतिवृष्टी यामध्ये शेतकरी व नागरिकांना दिलासा दिला.यामुळे राज्यातील शेतकरी, कष्टकरी ,गोरगरीब त्यांच्याकडे आशेने पाहतो आहे. सहकार, शिक्षण ,कृषी, ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रामध्ये नामदार थोरात यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी व ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी यांचे जीवन समृद्ध होण्यासाठी नामदार थोरात यांचे नेतृत्व सर्वांसाठी आश्वासन ठरत आहे.

**शब्दांकन : डॉ. सुधीरजी तांबे माजी आमदार**

**संकलन : डॉ. विश्वासराव आरोटे**
**संपादक दैनिक समर्थ गांवकरी**

## अहिल्यानगर–पुणे रेल्वे डबल लाईनचा डीपीआर पूर्ण

- प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळावी यासाठी केंद्राकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा
- खासदार नीलेश लंके यांची माहिती



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या अहिल्यानगर–पुणे नवीन दुहेरी (डबल लाईन) रेल्वेमार्गाचा डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) तयार झाला असून, या प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. केंद्र सरकारच्या पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत पुणे–नाशिक रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी विविध टप्प्यांवर काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून १३३ किलोमीटर लांबीचा अहिल्यानगर–पुणे नवीन डबल लाईन रेल्वेमार्ग प्रस्तावित असून, हा मार्ग अहिल्यानगर जिल्ह्यातील भागातून जाणार आहे. या संदर्भात खासदार लंके म्हणाले की, हा प्रकल्प केवळ दोन शहरांमधील अंतर कमी करणारा नसून शेतकरी, विद्यार्थी, कामगार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात थेट सकारात्मक बदल घडवणारा आहे. डीपीआर तयार होणे ही महत्त्वाची पायरी असून, आता मंजुरी व प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे आवश्यक आहे. अहिल्यानगर परिसरात यापूर्वीच रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. पुणतांबा –निंबळक दुहेरीकरण पूर्ण, निंबळक–अहिल्यानगर दुहेरीकरण प्रगतीपथावर असून, साईनगर शिर्डी–पुणतांबा दुहेरीकरणाला मंजुरी मिळाल्याने अहिल्यानगर हा पुणे, नाशिक, शिर्डी आणि मराठवाडा मार्गांचा केंद्रबिंदू ठरत आहे. अहिल्यानगर–पुणे डबल लाईन प्रकल्पामुळे शेतमाल वाहतूक सुलभ होईल, उद्योगांना चालना मिळेल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि धार्मिक पर्यटनालाही लाभ होईल, असेही खासदार लंके यांनी स्पष्ट केले. केंद्र व राज्य शासनातील संबंधित विभागांशी समन्वय साधून हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अन्यथा कायदेशीर कारवाई करणार

**बेल्हे: (समर्थ गांवकरी)**

बेल्हे येथील शिवसेना शिवसेना शाखेत झालेल्या पदाधिकारी मेळाव्यात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे युवा पदाधिकारी मयूर गुंजाळ यांनी शिवसेना उबाठा सोडून गेलेल्या गद्दारांना माझ्या वडिलांचा म्हणजेच राजाभाऊ गुंजाळ यांचे नाव व फोटो वापरू नये अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा दिला. यावेळी झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये दिलीप बाम्हणे, संभाजी तांबे, मयूर गुंजाळ, शांताराम सावंत, पांडुरंग गाडेकर, नारायण खुटाळ यांनी मार्गदर्शन करताना आम्ही राजाभाऊंचे म्हणजेच शिवसेना उबाठा गटाचे खंदे समर्थक आणि कट्टर शिवसैनिक असून हा गट सोडून गेलेले हे शंभर टक्के गद्दारच आहेत आणि जात असताना यांनी आमच्या कोणाशीही विचार विनिमय केला नसून यांना राजाभाऊ गुंजाळ यांचा फोटो व नाव वापरण्याचा कोणताही अधिकार नाही.

## बेल्हे गावातील प्रत्येक टपरीवर मिळतो गुटखा

- गुटखा विक्री जोमात अन्न प्रशासन कोमात

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

राज्यात गुटखा विक्रीला बंदी असतानाही जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील बेल्हे येथे गुटख्याची जोरदार विक्री सुरू असून, गुटखा येतो कुठून ? त्याचे वितरण कसे होते ? आणि टपऱ्यापर्यंत पोहोच कसा केला जातो ? असे अनेक प्रश्न निर्माण होत असून महाराष्ट्र शासनाची गुटख्यावर जर बंदी आहे तर मग ही साखळी हव्या आहेत पणे कशी काय चालू आहे ? असे अनेक अनुत्तरीत प्रश्न निर्माण होत आहेत आणि या विक्रेत्यांना कोणाचे तरी संरक्षण, पाठबळ किंवा आशीर्वाद असल्यामुळेच गुटखा विक्री जोमात आणि अन्न औषध प्रशासन मात्र कोमात गेल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात गुटखा विक्रीला बंदी आहे, परंतु बेल्हे येथे राजरोसपणे गुटखा विक्री सुरू असून बाहेरून रात्री-अपरात्री येणाऱ्या वाहनांमधून गुटखा बेल्हे येथील चौकाचौकात पोहोच होत असून, गुटख्याच्या पुड्यांच्या माळा पोत्यात खचाखच भरलेल्या असतात. रातोरात गुटख्याची पोती स्थानिक विक्रेते दुचाकी-चारचाकीतून घेऊन जातात. तसेच याचा साठा एकाच ठिकाणी न करता विखरून ठेवला जात असल्याने धाड पडली तरी ठोक विक्रेत्याचे फारसे नुकसान होत नाही. हाच साठा काही दिवसातच परिसरातील गावोगावच्या विक्रेत्याकडे मागणीनुसार पोहोच केला जातो आणि ही साखळी अगदी अव्याहतपणे व राजरोस चालू असल्याचे दिसून येत आहे. बेल्हे गावातील रस्त्यावर तसेच ठिकठिकाणी गुटख्याच्या रिकाम्या पुड्या दिसून येतातच परंतु सार्वजनिक शौचालयासह अनेक ठिकाणचे रस्ते, कोपरे गुटखा खाणाऱ्यांच्या पिचकाऱ्यांनी रांगोळी काढून सजविल्यासारखे दिसत आहेत. अन्न व औषध प्रशासनामार्फत गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे मात्र प्रशासनाकडून कुठल्याही विक्रेत्यांवर बेल्हे परिसरात गेल्या काही महिन्यांमध्ये कारवाई केल्याचे ऐकिवात नाही.

बेकायदा गुटख्याची विक्री सुरू असताना अन्न व औषध प्रशासन जाणून बुजून किंवा हेतू परस्पर याकडे दुर्लक्ष करतंय का ? हा प्रश्न निर्माण होत असून आणि फक्त कागदोपत्री जर बंदी केली असेल तर ती उठवावी जेणेकरून गुटका खाणाऱ्यांना स्वस्त दरात गुटखा तरी उपलब्ध होईल याचाही विचार प्रशासनाने करावा.


### गुटख्याची उपलब्धता भरपूर

बेल्हे गावातील टपऱ्या आणि दुकानांमध्ये मिळणाऱ्या गुटख्यामुळे गुटख्याला नक्की बंदी आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे, बंदी असलेली वस्तू सहजासहजी उपलब्ध होत नाही परंतु गुटखा मात्र मुबलक प्रमाणात मिळत असल्याने बंदीबाबत शंका उपस्थित होऊ लागली आहे. आजकाल महिला, मुली व बारा/तेरा वर्षांपुढील मुलेही गुटखा व्यसनाच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे. या गुटक्यामुळे तोंडाचा, अन्ननलिकेचा, आतड्याचा कर्करोग होत असून तसे सिद्धही झाले आहे. गुटख्याच्या अतिरिक्त सेवनामुळे भूक मंदावणे, तोंडाचे स्नायू आकडल्यामुळे जेवण घेता येत नाही व त्यामुळे शारीरिक कमजोरी निर्माण होते परंतु कुठल्याही व्यसनाचा शेवट हा वाईटच असतो हे स्वतःच्या लक्षात येत नाही, तसेच आपण विक्री केलेल्या गुटख्यामुळे एक पिढी बरबाद होत आहे याचे भानही त्या विक्रेत्याला किंवा ठोकविक्रेत्याला नसल्याचे दिसून येत आहे आणि याची कुणालाही खेद ना खंत.

## धुमाळवाडी येथील श्री सोमेश्वर देवस्थानला ग्रामीण तीर्थक्षेत्र ‘क’ वर्गाचा दर्जा मंजूर!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील धुमाळवाडी येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री सोमेश्वर देवस्थान मंदिरास ग्रामीण तीर्थक्षेत्र ‘क’ वर्गाचा दर्जा मंजूर झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकतीच अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या शिफारशीवरून पाठविण्यात आलेल्या श्री सोमेश्वर देवस्थानच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे अकोले तालुक्यातील हा एकमेव प्रस्ताव मंजूर झाल्याची माहिती समोर आली आहे.



अकोले शहराच्या मध्यवर्ती भागात, निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याच्या किनारी वसलेले अद्ययावत शिवालय असलेले श्री सोमेश्वर देवस्थान धुमाळवाडी येथे स्थित आहे. हे देवस्थान आगामी काळात अकोले तालुक्याच्या धार्मिक पर्यटन विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. वर्षभरात येथे महाशिवरात्री, भागवत कथा, शिवपुराण कथा, शिवलीला अमृत पारायण, सप्ताह, श्रावणमासातील सोमवार, वसंतपंचमी, दीपावली आदी विविध धार्मिक उत्सव व कार्यक्रमांचे आयोजन सोमेश्वर मंडळ धुमाळवाडी यांच्या वतीने करण्यात येते. त्यामुळे वर्षभर मोठ्या संख्येने भाविक या देवस्थानास भेट देत असतात. परिसर विकासाच्या दृष्टीने भक्तनिवास, बहुउद्देशीय सभा मंडप, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसादालय, मंदिर सुशोभीकरण आदी सुविधांचा समावेश असलेला विकास आराखडा मंदिर व्यवस्थापन समितीने तयार केला आहे. या आराखड्यानुसार पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील व आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या माध्यमातून देवस्थान विकासासाठी भरीव निधी उपलब्ध होऊन ग्रामीण धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल, असे मत प्रशांत धुमाळ यांनी व्यक्त केले. यापूर्वी आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी २० लाख रुपयांचा सभा मंडप आपल्या आमदार निधीतून मंजूर केला असून, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निधीतून ५ लाख रुपयांचे संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. धुमाळवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने पोलीस पाटील सौ. प्रणाली प्रशांत धुमाळ, सरपंच सौ. उज्वला किशोर धुमाळ, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व विक्रम घोलप यांनी देवस्थानचा प्रस्ताव तयार करून त्याच्या मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. या यशाबद्दल सोमेश्वर मंडळ व समस्त ग्रामस्थ धुमाळवाडी यांच्या वतीने पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार डॉ. किरणजी लहामटे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच आमदार सत्यजित दादा तांबे यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# संगमनेरच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार - लोकनेते बाळासाहेब थोरात



**नामदेव कहांडळ**
**जनसंपर्क अधिकारी, यशोधन कार्यालय**

महाराष्ट्रामध्ये प्रगतशील आणि सर्वांगीण विकासित असलेल्या तालुक्यांमध्ये संगमनेर तालुक्याचा समावेश होतो. किंबहुना बारामती पाठोपाठ संगमनेरचा अग्रक्रमाने उल्लेख होतो. संगमनेर तालुक्यातील शैक्षणिक,सामाजिक,आर्थिक आणि विकासातून झालेली प्रगती ही एका दिवसात झालेली नाही तर १९८५ पासून लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केलेल्या अथक आणि अविश्रांत परिश्रमातून निर्माण झाली आहे. म्हणून या तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे खरे शिल्पकार हे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात हे आहेत.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्वांचा वारसा घेऊन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी राजकारणात प्रवेश केला. दुष्काळी तालुक्याला विकसित तालुका बनवण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि १९८९ मध्ये प्रथमतः भंडारदर्याच्या हक्काच्या पाण्यासाठी तीव्र लढा दिला. या संघर्षातून संगमनेर तालुक्याला ३० टक्के हक्काचे पाणी मिळाले. पाणी म्हणजे जीवन या अर्थाने यापुढे काम करताना त्यांनी तालुक्यामध्ये पाईप लाईनचे जाळे निर्माण केले. त्यामधून शेती फुलली.

१९९१ ते ९५ या काळामध्ये कृषी व्यवसायाला पूरक अशा दूध व्यवसाय वाढीसाठी गावोगावी संस्था स्थापन केल्या. संकरित गाईंच्या माध्यमातून शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध झाला. याचबरोबर गावोगावी पतसंस्थांचे जाळे निर्माण केले. याच कार्य काळामध्ये जलसंधारणाचे खूप मोठे काम होऊन प्रत्येक गावात ओढ़े, नाले या ठिकाणी कोल्हापुरी व दगडी बंधाऱ्यांचे जाळे निर्माण झाले. गावोगावी विद्यालय निर्माण होऊन शिक्षणाची मोठी सुविधा निर्माण झाली.

आरोग्य, शिक्षण,शेती,सहकार अशा सर्व माध्यमातून तालुका पुढे जात असताना तळेगाव सह दुष्काळी भागाला वरदान ठरणाऱ्या निळवंडे धरणासाठी त्यांनी सर्वस्व अर्पण केले. १९९९ मध्ये पाटबंधारे राज्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर अनंत अडचणीवर मात करून निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. हे ऐतिहासिक काम पुढील अनेक पिढ्यांसाठी वरदान ठरणारे ठरले आहेत. आज संगमनेर तालुक्यात निळवंडे धरणाच्या उजवा व डावा कालव्यातून पाणी येत असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी निर्माण झाली आहे. दुष्काळी शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आल्याने स्वप्नपूर्ती झाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

याचबरोबर या कामात मदत करणाऱ्या सर्वांचे प्रति कृती कृतज्ञता सुद्धा या लोकनेत्यांनी व्यक्त केली.

संगमनेरच्या जनतेचा मोठा पाठिंबा आणि नेतृत्वाचा विश्वास या बळावर राज्यात महसूल मंत्री प्रदेशाध्यक्ष, कृषीमंत्री,शालेय शिक्षण मंत्री,रोजगार हमी मंत्री अशी विविध मंत्रिपदाचे खाती सक्षमपणे सांभाळताना या सर्व खात्यांना बाळासाहेब थोरात यांनी लोकाभिमुख व कार्यक्षम केले. आपल्या कामातून ठसा उमटवत राज्यभरात आदर निर्माण केला.

याचबरोबर स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा असलेल्या बाळासाहेब थोरात यांनी अडचणीच्या काळात काँग्रेस



पक्षाची धुरा सांभाळली. राजकारण हे सर्वसामान्यांच्या विकासासाठी करायचे असते सत्तेसाठी नाही. हा विचार घेऊन लोकशाही व राज्यघटना वाचवण्यासाठी त्यांनी काम केले. त्यांच्या याच कामाची राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आणि काँग्रेसच्या महत्त्वाच्या २१ नेत्यांच्या यादीमध्ये संगमनेरच्या या सुपुत्राने आपला सन्मान मिळाला.

संगमनेर शहर आणि तालुका हे विकासाचे आणि प्रगतीचे मॉडेल राज्यासाठी दिशादर्शक ठरले आहे. आज सहकार, शिक्षण,समाजकारण, बाजारपेठ, बँकिंग ,शांतता ,सुव्यवस्था, वैभवशाली इमारती आणि सातत्यपूर्ण विकास हे एका दिवसात झालेले नाही तर त्यासाठी मागील ४० वर्षे लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अविश्रांत काम केले आहे.

आणि त्या माध्यमातून देवकौठे ते बोटा असा १०० किलोमीटर लांबी असलेला विस्तीर्ण संगमनेर तालुका समृद्ध केला आहे. संगमनेरच्या बँकिंग क्षेत्रात सुमारे १० हजार कोटींच्या ठेवी आहेत. तर शिक्षणामध्ये गुणवत्ता असल्याने सर्व महाविद्यालय शहरात आहेत. तालुक्यातून दररोज साधारण ९ लाख लिटर दूध उत्पादन होत असून १५ लाख अंडी निर्मिती होत आहेत. मोठी आर्थिक उलाढाल आणि आर्थिक संपन्नता ही या तालुक्याची जमेची बाजू आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र घेऊन तालुका पुढे नेला आहे. कार्यक्षम व्यक्तींना संधी दिली आहे. सांस्कृतिक, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रात युवकांना व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. सर्वांग सुंदर तालुका निर्मितीचे श्रेय हे लोकनेते बाळासाहेब थोरात यांना असून या नेतृत्वाचा २०२४ मध्ये अनपेक्षित झालेला पराभव हा महाराष्ट्रासाठी मोठा चटका लावणारा ठरला. अनपेक्षित सर्व घडले होते परंतु लोकनेते बाळासाहेब थोरात हे थांबले नाही. ते आजही सातत्याने जनतेमध्ये आहेत. तरुणाई साहेबांच्या पाठीशी एकवटली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राज्यातून सर्वाधिक मतांनी संगमनेर नगरपालिकेत जनतेने थोरात साहेबांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांना मोठे यश दिले. साहित्य,कला, नवनिर्मिती, वाचन या सर्व क्षेत्रांची आवड असणाऱ्या लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कायम स्व.यशवंतराव चव्हाण यांचा वारसा जोपासला आहे. ज्येष्ठांचा सन्मान करून तरुणांना प्रोत्साहन दिले आहे. तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाशी नाळ जोडून ठेवताना प्रत्येकाच्या सुख - दुःखात ते सहभागी होत आहे. आणि म्हणून त्यांनी दिलेली एक तालुका एक परिवार ही संकल्पना राज्यामध्ये आदर्शवत ठरली आहे.

**आजही तोच रुबाब, तीच गर्दी, तोच आदर, तोच मान – सन्मान, टिकून आहे. येणारा काळ हा थोरात साहेबांच्या नेतृत्वात महाराष्ट्राला दिशा देणारा ठरणार आहे.**

**संगमनेर तालुका व शहर प्रगतशील बनवणाऱ्या या विकासाच्या महानायक असलेल्या नेतृत्वाला वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा**

# जाणता राजा...

**सौ. दुर्गा सुधीर तांबे**
**माजी नगराध्यक्षा, संगमनेर नगरपालिका**

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतीक, सामाजिक,राजकीय चळवळीत जे अनेक परिवार पिढ्यान पिढया त्याच सातत्याने समाजात काम करतात त्यात थोरात पाटील हा एक नावाजलेला परिवार आहे पिढ्यान पिढया कष्टाळू वृत्ती, सर्वधर्म समभावाची वागणुक, नेतृत्व गुण, पुरोगामी विचार दूरदृष्टी, अध्यात्मिकता असे सर्व गुणसंपन्न असा हा परिवार आहे उत्तम नेतृत्व घडते त्याला अनेक गोष्टी कारणीभूत असतात नेतृत्व एक दिवसात घडत नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील जोर्वे हे एक ऐतिहासिक गाव. सह्याद्रीच्या कुशीत उगम पावणारी अमृतवाहिनी प्रवरा नदीच्या तीरावर वसलेले हे एक संपन्न गाव. नदीच्या काठावर प्रसिध्द एकमुखी दत्ताचे मंदिर, पुरातन काळातील कथा असलेले, सर्वांची श्रध्दा असलेलेधार्मिकस्थळ. ऐतिहासिक संस्कृती असणारे जोर्वे संस्कृती म्हणून दिल्लीच्या संग्रहालयात असणारे हे प्रसिद्ध गाव.

थोरात पाटील परिवाराची परंपराच वेगळीच. हे आमचे पंजोबा गंगाराम पाटील थोरात हे गावचे पाटील व पंजी मंजुळाबाई थोरात अर्थात गावची

म्हणजे सर्व संस्कार मोठ्या माणसांच्या कृतीतूनच झाले. आमच्या कुटुंबात सर्वांना कष्टाची सवय, शेतीची कामे, स्वत:करण्याची पद्धतच होती. आमची आई ति.मथुराबाई दादांच्या कामाच्या व्यापामुळे संपुर्ण शेती सांभाळत. दादांना वेळ मिळेल तसे ते शेतात स्वत:राबत त्यामुळे बाळासाहेबही सर्व शेतीची कामे शिकले. ट्रॅक्टरने नांगरणी करणे, पेरणी, मोटारींच्या दुरुस्त्या, गायी म्हशींचे संगोपन इ. सर्व कामे तो स्वत: करत असे एकदा ते डिझेल इंजिन दुरुस्ती करतांनी एक भाग पायावर पडून पाय फ्रॅक्चर झाला होता.

आमच्या घरी आजोबांचे ग्रंथालय होते. त्यात स्वामी विवेकानंद चरित्र, भगवतगीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, सर्व धार्मिक ग्रंथ होते. नंतर दादांचेही वाचन खूप असल्याने त्यात अनेक चरित्र जगातील लढे, कम्युनिझमचे अनेक पुस्तके होती. त्यातूनच घरांत सर्वांनाच वाचनाची आवड निर्माण



पाटलीण.त्यांचा गावात खुप दरारा. सगळंगाव त्यांना खूप घाबरे ह्या उभयतांचे व्यक्तीमत्वच तसे होते. सगळ्या गावाला सांभाळून घेणारे असे जबरदस्त दांपत्य. त्यांच्या ह्या अनेक पैलू असलेल्या वागण्यातूनच परिवार घडत गेला. पुढे माझे आजोबा संतुजी पाटील थोरात व आजी सिताबाई यांच्या पोटी सहा भावंड झाली. तीन मुले व तीन मुली, त्यातील माझे वडील स्व.भाऊसाहेब हे सर्वात थोरले. त्यानंतर पंडीतराव, मधुकर हे बंधु व भगिनी हिराबाई, मीराबाई व ताराबाई.माझे वडील स्व भाऊसाहेब थोरात यांनी वयाच्या १८ व्या वर्षापासुन ८६ व्या वर्षापर्यंत स्वांतत्र्याची चळवळ सहकाराची उभारणी, अनेक चळवळी यात अखंड ६८ वर्ष घालविली. हे सर्व करता करता कुटुंबातील कर्तव्यही पार पाडली.माझे वडील तिर्थरुप स्व.भाऊसाहेब थोरात व आई ति.मथुराबाई यांच्या पोटी ७ फेब्रुवारी १९५३ रोजी श्री.बाळासाहेबांचा जन्म संगमनेर खुर्द येथे आजोळी झाला. आम्ही चार बहिणी व आम्हा बहिणींचा सर्वांचा लाडका भाऊ. आम्ही बहिणी, भाऊ त्याला आदराने भाऊम्हणतो. पुढची पिढी त्याला आबाम्हणते. ग्रामीण भागातील सर्व संस्कार भाऊंवर झाले.

झाली. नंतर भाऊंची ही पुस्तक वाचन, संग्रह वाढतच गेला. वस्तीवर दादांनी शामची आई, बनगरवाडी इ पुस्तकांचे सामुदायिक वाचन ठेवले होते. दादांना स्वातंत्र्य चळवळीत डॉ.अण्णासाहेब शिंदे, ड. रावसाहेब शिंदे, ड. पी. बी. कडु पाटील, धर्माजी पोखरकर इ. सहका-यांसोबत सहवासामुळे तुरुंगातील वास्तव्यात सामुदायिक वाचनाची सवय लागली होती. वाचनाची तीच परंपरा आज पुढच्या पिढीतही चालुच आहे.

थोरात परिवारात जात-पात कधी मानली नाही. मुस्लीम समाजाची चाँदबीबी आई ही आमच्या कुटुंबातील सदस्यच होती. माझ्या आईचे व तिचे मायलेकीचे नाते होते. चांभार समाजाच्या वनाई, शांताबाई भोसले ह्या आईच्याजीवलगमैत्रिणी होत्या. चांभार समाजाच्या सावित्रीमामी आमच्याकडे स्वयंपाकाला होत्या. सावित्रीमामींना अतिशय स्वच्छतेची आवड.घरी सर्व आवरुन देवपुजी करुन स्वत:व्यवस्थितच मग स्वयंपाकाला येणार अशी सर्व धर्म समभावाची शिकवण कुटुंबात होती तसेच संस्कार भाऊंवर झाले.

# डॉ. संजय खेडेकर यांना वैद्य खडीवाले पुरस्कार

**पुणे/राहुरी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील आयुर्वेद व रसशास्त्र विषयातील अत्यंत मानाचा समजला जाणारा 'वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्था' व 'महर्षी आण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार समिती' यांचेतर्फे यावर्षीचा "वैद्य द.वा.शेंड्ये रसौषधी पुरस्कार" यावर्षी मूळचे राहुरी येथील डॉ.संजय भाऊसाहेब खेडेकर यांना महाराष्ट्रातील ज्येष्ठ रंगकर्मी "श्री.प्रशांतजी दामले' यांच्या हस्ते पुणे येथील टिळक स्मारक मंदिर येथे आयुर्वेद क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. मागील ४० वर्षांपासून नियमितपणे देण्यात येणारा हा पुरस्कार असून रु.एकवीस हजार रोख,प्रमाणपत्र,स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. डॉ.संजय हे आयुर्वेदातील रसशास्त्र या अत्यंत महत्वाच्या शाखेतील एक प्रख्यात संशोधक,शिक्षक व अभ्यासू चिकित्सा तज्ञ असून त्यांनी आयुर्वेदीय औषधनिर्मिती,

धातु-खनिज प्रक्रिया,भस्म सिद्धी तसेच आयुर्वेद औषधांच्या गुणवत्ता विषयक शास्त्रीय निकषांवर सखोल कार्य केलेले आहे. रसशास्त्र विषयातील तात्विक तसेच व्यावहारिक ज्ञान देशभरातील आयुर्वेद विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यात डॉ.खेडेकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आयुर्वेदाची वैज्ञानिक विश्वासार्हता वाढविण्यात त्यांचा मोलाचा सहभाग आहे. सुवर्णभस्म व त्यापासून निर्माण होणाऱ्या औषधांपासून मधुमेह,कर्करोग तसेच कोरोना काळातील म्युकर मायकोसिस च्या अनेक रुग्णांना डॉ.खेडेकर यांच्यामुळे नवीन जीवन लाभले आहे. डॉ.खेडेकर यांना यापूर्वी 'आंतरराष्ट्रीय ग्रँट अवॉर्ड', भारत सरकारच्या आयुष मंत्रालयातर्फे 'उत्कृष्ट संशोधक पुरस्कार', तसेच "महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेन्द्रजी फडणवीस" यांच्या हस्ते 'राष्ट्रीय रसाचार्य' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. डॉ.संजय खेडेकर हे सध्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान,गोवा येथे रसशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळत आहेत;येथील एकात्मिक ऑन्कॉलॉजी रिसर्च व केअर सेंटरचे कन्व्हेनर आहेत, हे भारतातील पहिले असे केंद्र आहे जे आयुर्वेद,योग, पंचकर्म, आहार चिकित्सा व आधुनिक ऑन्कॉलॉजीला एकत्र करून कर्करोग रुग्णांसाठी समग्र पुनर्वसन व उपचार पुरवते.

# वीज वितरण कर्मचारी होत आहेत जनतेच्या रोशाचे धनी

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

पोलीस, लष्करी जवान आणि वीज वितरण कर्मचारी यांना जनतेच्या सेवेसाठी २४ तास सजग राहावे लागत असून जनतेची सेवा हाच त्यांच्यासाठी दुवा असतो. त्यातही वीज वितरण कर्मचारी प्रत्येक क्षणाला आपला जीव धोक्यात टाकून जनतेच्या सेवेसाठी सदैव सज्ज राहत असतो.महावितरण कर्मचारी एक प्रकारे चोवीस तास समाजाप्रती बांधील असतो, अचानक वीज पुरवठा खंडित झाला तर मग वेळ कोणतीही असो या कर्मचाऱ्यांना रागाचे धनी व्हावे लागते. त्याच बरोबर आजकाल गल्लीबोळात स्वयंघोषित पुढाऱ्यांचा सुळसुळाट झाला असून एखाद्या मोठ्या नेत्याचे नाव घेऊन वितरण कर्मचाऱ्यांना घरच्या कामगारासारखे नको ते शब्द वापरून सर्वसामान्य लोकांमध्ये आपला वट किती आहे हे भासविण्याचा प्रयत्न करत असतात. खूप वेळा वीज बिल न भरलेल्या लोकांकडे बिलाच्या वसुलीला गेले असता हे लोक कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, दादागिरी, शिवीगाळ सुद्धा करतात. वीज वितरण कर्मचाऱ्यांना एखाद्या कस्पटाप्रमाणे वागणूक दिली जात असल्याचे जाणवत आहे. ज्या कर्मचाऱ्यांच्या जीवावर तुमच्या सर्व दैनंदिन गरजा पुऱ्या होतात. घरातील उजेडापासून ते तुमच्या दळणकांडापर्यंत सर्वकाही आज विजेवर अवलंबून आहे व त्या प्रमाणात येणारे वीज बिल भरणे हेही आपलं कर्तव्य आहे परंतु विजेचा गैरवापर करणे, विजेच्या मीटरमध्ये छेडछाड करणे, वायरिंग मध्ये काहीतरी उलटापालट करणे व त्यातून आपले बिल कमी करण्याचा प्रयत्न जवळपास ७० ते ८०% जनता करत असते परंतु या प्रकाराची वीज वितरण कर्मचाऱ्यांकडे सर्व माहिती त्यांच्या संगणकावरती नोंद होत असते आणि त्यानुसार एखाद्या ग्राहकाचा वीज वापर एखाद्या महिन्याला अचानक जर कमी झाला तर त्या ठिकाणी शंका येण्यास वाव असतो आणि यावेळेस त्या त्या विभागाचा अभियंता आपल्या कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी चौकशी करण्यास पाठवत असतो.

# बांगर्डे जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान प्राधिकरणाची माहिती

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

बांगर्डे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी नुकताच एक शैक्षणिक आणि अनुभवसंपन्न उपक्रम शाळेच्या शैक्षणिक सहली दरम्यान आयोजित करण्यात आला. या सहली अंतर्गत विद्यार्थ्यांनी पुणे येथील आंतरराष्ट्रीय लोहगाव विमानतळाला भेट देत भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या (Airports Authority of India) कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली.




या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विमानतळावरील विविध विभागांची ओळख करून देण्यात आली. विमानांची उड्डाण व लँडिंग प्रक्रिया, हवाई वाहतूक नियंत्रण व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा, धावपट्टीचे महत्त्व तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी घेतल्या जाणाऱ्या खबरदारीची माहिती भक्ती लुला मॅडम, राजेंद्र साहेब, लांडगे साहेब, स्वरा मॅडम , साठे सर व सुरक्षा अधिकारी या अधिकाऱ्यांनी अडीच तास वेळ देऊन सोप्या भाषेत समजावून सांगितली. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे चॉकलेट, नाष्टा, पाणी बॉटल देऊन आदरातीथ्य केले.

विमानतळावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू प्रश्नांना उत्साहाने उत्तरे देत त्यांना हवाई वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबतही मार्गदर्शन केले. विमानतळावरील तिकीट काउंटर, लगेज चेकअप ,करन्सी एक्स्चेंज,सरकते जिने, एरोप्लेन फ्युअल सिस्टीम,एअर ब्रिज, ग्राउंड स्टाफ, लगेज कलेक्ट बेल्ट,इंटरनॅशनल एअरपोर्ट इत्यादी बद्दल खूप छान माहिती मिळाली, प्रत्यक्ष विमान जवळून पाहण्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला.

या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून विज्ञान व तंत्रज्ञानाबद्दलची त्यांची उत्सुकता अधिक वाढली आहे. विद्यार्थ्यांनी हा अनुभव आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असल्याची भावना व्यक्त केली.

यासाठी पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कानडी मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी बोरुडे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी आरु मॅडम, केंद्रप्रमुख कडूस साहेब यांनी प्रोत्साहन दिले. व अभिनंदन केले. यावेळी शाळेचे मुख्याधापक शेख समीर सर, झगडे सर, चौधरी सर, चौधरी मॅडम यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, विद्यार्थी अनुभव समृद्ध बनतात व असे अनुभव विद्यार्थ्यांच्या स्मृती पटलावर चिरकाल टिकतात असे मत व्यक्त केले.

## वारस नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/फौजदारी / वारस दाखला/०५/२०२६ — अकोले दि. ०५/०२/२०२६

श्री. प्रशांत कोंडाजी डगळे, रा. खिरविरे, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे वडील कै. कोंडाजी बहिरु डगळे दि. १५/१२/२०२५ रोजी एसएमबीटी हॉस्पिटल धामणगाव, ता. इगतपुरी येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा केळी रुम्हणवाडी येथे प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | ज्योती कोंडाजी डगळे | ५५ | पत्नी |
| २ | प्रशांत कोंडाजी डगळे | ३३ | मुलगा |
| ३ | प्रियंका लोकेश भांगरे | २९ | मुलगी |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.


**तहसिलदार, अकोले**











हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)